# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women In Distress Situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **09/01/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव येथील रात्रगस्त करिता असलेले पोलिस अधिकारी/अमलदार यांनी दिनांक 06 जानेवारी रोजी दरम्यान पुण्यावरून छत्तीसगड येथे प्रवास करणाऱ्या महिलेची प्रसूती ही प्रवासादरम्यान झाली होती तसेच सदर महिलेला मदत करण्यासाठी कोणीही नातेवाईक नसल्याने प्रसूती झालेल्या महिलेस पोलिसांनी हॉस्पिटलमध्ये दाखल करून तिला मदत केली आहे या पोलिसांच्या कामाप्रती सदर महिलेने पोलिसांचे आभार व्यक्त केले या कामामुळे समाजातून पोलिसांचे कौतुक होत आहे

लोकमत



रात्र गस्तीवर असताना प्रसूत महिलेची मदत करणारे पोलीस कर्मचारी.

## अन् 'त्या' महिलेने प्रवासातच दिला गोंडस बाळाला जन्म!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : पुण्यावरून छत्तीसगडच्या दिशेने निघालेल्या खासगी ट्रॅव्हल्समध्ये प्रवास करित असलेल्या एका २७ वर्षीय गरोदर महिलेने बस मालेगाव शहरानजिक असताना प्रवासादरम्यानच बाळाला जन्म दिला. विशेष म्हणजे तिच्यासोबत कुणीही नातेवाईक नव्हता. याचवेळी चालकाला समोर रात्रगस्तीवर असलेली पोलीस व्हॅन दिसली. त्याने क्षणाचाही विलंब न करता मदतीची याचना केली. पोलिसांनीही तातडीची पाऊले उचलत महिला व तिच्या नवजात बालकाला रुग्णालयात पोहोचवून माणुसकीचे दर्शन घडविले. हा घटनाक्रम ६ जानेवारीच्या रात्री घडला.

याबाबत अधिक माहिती अशी की, उषा पुष्पकुमार मिसाद (२७, रा. छत्तीसगड) ही गरोदर महिला पुण्यावरून छत्तीसगडकडे निघालेल्या ट्रॅव्हल्समधून प्रवास करत होती. तिच्यासोबत कुणीही नातेवाईक नव्हता. अशात ट्रॅव्हल्स मालेगाव शहरानजिक येताच उषाच्या पोटात असह्य वेदना व्हायला लागल्या. काही क्षणातच तिने गोंडस बाळाला जन्म दिला. या सर्व प्रकारामुळे बसमधील प्रवाशांसोबतच चालकही पुरता भांबावून गेला. याचदरम्यान चालकाला रात्रगस्तीवर असलेली पोलिसांची व्हॅन दिसली. त्याने खाली उतरून पोलीस उपनिरीक्षक रामकिशन जायभाये, पोलीस अंमलदार रवींद्र लोंखडे, नाईक सुधीर सोळंके, किशोर नवलकर यांना घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनीही तातडीने महिला व तिच्या बाळाला शासकीय रुग्णालयात दाखल करून दोघांकरिता उबदार कपड्यांची व्यवस्थादेखील केली. उषा मिसाद यांची प्रकृती आता चांगली असून तिला नातेवाईकांसमवेत छत्तीसगडला पाठविण्यात आले आहे.

### महिलेने मानले पोलिसांचे आभार

रात्रगस्तीवर असलेल्या पोलिसांनी गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण ठेवण्यासोबतच अडचणीत फसलेल्या नागरिकांच्या मदतीला धावून जाणे अभिप्रेत आहे. नागरिकांची ही अपेक्षा मालेगाव पोलिसांनी प्रत्यक्षात सार्थ केली आहे. प्रवासादरम्यान प्रसूत झालेल्या उषा मिसाद या महिलेनेही याप्रती पोलिसांचे आभार व्यक्त केले.

Hello Washim
Page No. 1 Jan 08, 2022
Powered by: erelego.com